



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

IRBK-0106265



देवगांवचें

# रामराज्य

नवसाक्षरांसाठीं

सुबोध कथा

* * *


शां. कृ. क्षीरसागर

मुख्याध्यापक

उरुळी कांचन



अनुक्रम
विभाग
क्रमांक



। ज्ञान दीप लावूं जगीं।

...ाला प्रकाशन पुणें



IRBK-0106265


किंमत आठ आणे.

मुद्रक व प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी,
( बी. ए. टिळक )
चित्रशाळा प्रेस,
१०२६, सदाशिव
पुणें २.

• • •

सर्व हक्क स्वाधीन

• • •

आवृत्ति पहिली
१९५७

• • •

चित्रकार
म. वि. सोवनी,
६७०, सदाशिव पेठ,
पुणें २.

## श्री. शां. कृ. क्षीरसागर यांचीं पुस्तकें


| | |
|---|---|
| १. गोष्टीमय रामायण | आठ आणे |
| २. उमजापूरचा आनंदराव | चार आणे |
| ३. रामायणांतील सोप्या गोष्टी | पांच आणे |
| ४. महाभारतांतील सोप्या गोष्टी | सहा आणे |
| ५. मधू | सहा आणे |
| ६. दोघे सोबती | सहा आणे |
| ७. शबरी | सहा आणे |
| ८. बोलकी बाग | आठ आणे |
| ९. देवगांवचें रामराज्य | आठ आणे |
| १०. मुलांचे थोरले बाजीराव | ( आगामी ) |
| ११. सोना आणि त्याचे सोबती | ( ,, ) |

• • •

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | ओळख | ३ |
| २. | गांवठाण | ६ |
| ३. | वसंतराव | ९ |
| ४. | सुमंत भालेराव | १२ |
| ५. | सुगंधाताई | १५ |
| ६. | विकास मंडळ | १८ |
| ७. | गुणवंतीला धरण | २१ |
| ८. | लक्ष्मी | २४ |
| ९. | हरिजन आणि गिरिजन | २७ |
| १० | देवीचा उरूस | ३० |
| ११. | ठाकरवस्ती | ३४ |
| १२. | आदर्श गांव | ३६ |


• • •



## १. ओळख

जय हिंद मंडळी, जय हिंद.

हें पाहा देवगांव.

देवगांवच्या मावळतीला भला मोठा डोंगर आहे. डोंगरावर भरपूर झाडें आणि गवत आहे. डोंगरावर अगदीं माथ्याला महादेवाचें जुनाट देऊळ आहे. या महादेवापासून आमची नदी निघाली आहे.

काय म्हणतां, नदीचें नांव ?

गुणवंती.

आणि डोंगराचें नांव ?

सदोबा.

सदोबाच्या डोंगरावर सागाचीं, खैराचीं, आंवळीचीं, बिब्याचीं, पळसाचीं, आणखी कितीतरी निरनिराळीं झाडें आहेत. करवंदीच्या जाळ्या पण ठिकठिकाणीं आहेत.

बरं, पुढं ?

सदोबाच्या डोंगराला तीन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यावर देवगांवचे लोक गुरें चारायला आणतात. दुसऱ्या टप्प्यावर झाडें आहेत, उंच उंच गवत आहे, वेळूचीं बेटें आहेत.

अस्सं होय ?

तिन्ही टप्प्यांत दुसरा टप्पा फार मोठा आहे. तिसऱ्या टप्प्यावर महादेवाचें देऊळ आहे. गुणवंती नदी निघाल्याची खूण म्हणून गुणवंतीचें तळें आहे. तळें फक्त पावसाळ्यांत भरलेलें असतें; पण गम्मत दुसरीच आहे.

कोणती ?

तळ्याचा दगड पाटीवरच्या पेन्सिली करण्याजोगा आहे असें लोक बोलतात.

आणखी काय ?

पहिल्या टप्प्याच्या पायथ्याला जुनाट धरण आहे. हें गुणवंतीचें धरण गाळानें सगळें भरून गेलें आहे. सरकार धरणाचा दरवर्षीं उन्हाळ्यापुरता लिलांव करते. आणि मग लिलांव घेणारे त्यांत हरभरा, वाटाणा अशीं पिकें काढतात. धरणापासून हम-चौरस एक मैल देवगांवची शेती आहे. नंतर देवगांवचें गांवठाण लागतें.

आमच्या या देवगांवच्या उगवतीला माळरान आहे. तें चांगलें हमचौरस तीन मैल आहे. बाकी जमीन पडीत आहे. एखादें पीक काढलें, न काढलें अशी पूर्वेकडील जमिनीची स्थिति आहे. देवगांवच्या दाक्षिणेला आणि उत्तरेला मैलामैलाचा शिवार आहे. उत्तरेच्या बाजूला महादेव कोळ्यांची वस्ती आहे आणि दाक्षिणेला ठाकर लोकांची वस्ती आहे.

ठाकर लोक मध गोळा करतात, मेण जमवतात, डिंक गोळा करतात आणि मोठ्या गांवांत नेऊन विकतात. कोळी लोक गवत, इमारतीचीं लाकडें व वेळू नेऊन विकतात. ठाकर

लोक सरपण नेऊन विकतात. हंगामाप्रमाणें रानांतल्या वस्तु नेऊन विकतात. कधीं करवंदें तर कधीं बोरें, कधीं आंवळे तर कधीं चिंचा, कधीं बिब्बे तर कधीं मुरड शेंगा, तर कधीं गेळफळें वगैरे. ठाकर व कोळी मधून मधून हरणें व ससे पकडतात व विकतात. जिवंत ससे विकतात आणि हरणांचीं कातडीं विकतात. ठाकर व कोळी शेती करतात;पण बिचाऱ्यांची जमीन अगदीं वरकस!

खुद्द गांवांत मराठे लोक राहतात. दोन सुताराचीं, एक कुंभाराचें, एक गुरवाचें आणि एक न्हाव्याचें घर आहे; पण सगळ्यांचा मुख्य धंदा शेतीचाच. देवगांवचा सुतार, देवगांवचा गुरव इतकेंच काय देवगांवचा ब्राह्मण देखील शेतीच करतो.

आणि देवगांवचे हरिजन ? हरिजनांना फार थोडी शेती आहे. हरिजनांच्या शेतीचीं नांवें हाडकी आणि हाडवळा; पण त्यांत वांटण्या फार. जमिनीला मुळींच कस नाहीं. महारांना जमिनीची चिंधी तरी आहे; पण मांगांना, होलारांना मुळींच जमीन नाहीं. चांभारानें एक तुकडें घेतलें आहे. चांभार तें मोलानें करून घेतो. बलुत्यामध्यें चांभार, न्हावी आणि सुतार यांची स्थिति बरी आहे. यांच्यावांचून शेतकऱ्यांचें अडतें,शेतकऱ्याचें नडतें.


चांभाराला, सुताराला, न्हाव्याला बलुतें मिळतें. तें मनाजोगें मिळतें. शेंगांच्या खणतीला शेंगा पाटीभर मिळतात. गहूं, हरभरा, कठणमठण, होय नाहीं सर्व कांहीं शेतकरी या तिघांना देतो. यामुळें गांवांत चांभाराची, सुताराची व न्हाव्याची स्थिति बरी आहे. बाकी सारे भुकेकंगाल. घरटीं एखादा माणूस मुंबईला कमाईला जातो; तेव्हां कशीतरी पट्टी–पासोडी भागते.

रंगराव पाटील, दौलतराव चौधरी आणि रामधनशेट एवढींच गांवांतलीं सुखी माणसें.

सगळा गांव सुखी होण्याला काय उपाय ? का असेंच हें पिढ्यान् पिढ्या चालायचें ?

येरे दिवसा आणि भररे पोटा !

• • •



## २. गांवठाण

ही पाहा देवगांवासमोरून आडवी गुणवंती नदी वाहात आहे. गुणवंतीचा उगम जवळच असल्यानें गुणवंती ओढ्यासारखी दिसते. गुणवंतीला पाणीहि भरपूर नाहीं.

देवीच्या देवळाजवळ डोह आहे. तेथेंच काय तो पाण्याचा सांठा. डोहाच्या कांठाला भोंकरीचीं झाडें आहेत. म्हणून त्याला भोंकर डोह म्हणतात.

देवीचें देऊळ व गांवठाण यांमध्यें लहानसा ओहोळ आहे. या ओहोळाला घातक्या ओहोळ म्हणतात. पावसाळ्यांत याला अवचित पाणी येतें आणि कधीं शेळी तर कधीं वासरूं घातक्या ओहोळांत दगावतें.

घातक्या ओहोळ जेथें नदीला मिळतो तेथें अलीकडे हरिजनांची वस्ती आहे. त्याच्या अलीकडे चांभारवाडा आहे. त्याच्या जवळच मांगवाडा आणि होलारांची वस्ती आहे. तेथून आडवा

रस्ता ओलांडला कीं, पाटलाचा मोठा वाडा लागतो. आतां खऱ्या गांवाला सुरुवात झाली.

जणूं काय महार, मांग, चांभार, कैकाडी, होलार हे गांवाचे कोणीच नाहींत. यांना गांवापासून दूर ठेवलें आहे. पण तसें कशाला? सुतारवाडा, परीटवाडा, कुंभारवाडा हे सुद्धां तुटून असल्यासारखे वाटतात. ज्यानें त्यानें आपापल्या धंद्याच्या सोयीसाठीं मोठमोठ्या जागा राखून ठेवल्या आहेत असें वाटतें.

सणाच्या निमित्तानें, खेळाच्या निमित्तानें सगळा गांव एका ठिकाणीं जमतो.

मारुतीच्या देवळापुढें वडाचा पार आहे ना, तेथें सगळे गांवकरी हरिजन बंधुसुद्धां जमतात आणि सणाची व खेळाची मौज लुटतात.

तुम्हांला नवल वाटेल पण आमच्या देवगांवला आमच्या आजापणजापासून शिवाशिवीचें आणि विटाळाचें फारसें बंड नाहीं.

आमच्या मागली पिढी शिंतोडा टाकला कीं, शुद्ध होत असे. आजोबांच्या वेळेलाहि बहुतेक असेंच होतें.

समजा मांगाला चऱ्हाट वळूं लागायच्या वेळेला एखाद्या शेतकऱ्यानें मदत केली म्हणून काय त्याला इतर लोक हाडहुड करीत होते? मुळींच नाहीं. फक्त त्याच्या अंगावर पाण्याचा शिंतोडा टाकला कीं, झाला तो शुद्ध.

चांभाराच्या घरीं मोट शिवायला गेला अथवा कांहीं सांधायला गेला; तरी शेतकरी घरीं आला कीं, नुसत्या शिंतोड्यानें, पाणी उडवल्यानें शुद्ध होत असे. रानावनांत शेता–पोतांत हरघडी ओझें उचलायला, काम करायला माणसांची मदत लागते. आणि हरिजन नेहमीं मदतीला येतात. मग काय कधीं कोणी हरिजन शिवल्यावर आंघोळ केली काय? मुळींच नाहीं.

पाण्याचा शिवका, गाईचें दर्शन, गाईच्या शेपटाला हात लावणें एवढ्यावर विटाळ पळून जात होता. आणि आज तर तुम्हांला विटाळाचा मागमूस दिसणार नाहीं.

शाळेंत सगळ्या जातींचीं मुलें सरमिसळ बसतात.

कथाकीर्तनांत, तमाशांत, पोवाडयांत सगळीं मिळून मिसळून बसतात.

हॉटेलांतून चहा सगळींच पितात. गांवठाणांतून बाहेर पडल्यावर परगांवीं, बाजारांत कोणी कोणाचाच विटाळ मानीत नाहींत.

मात्र गांवांतल्या गांवांत जेवणखाण मात्र अजून एके ठिकाणीं होत नाहीं.

होत नाहीं कसें? परवां देशमुखांच्या सारजेचें लग्न झालें. त्या वेळीं रात्रींच्या वेळीं गॅसच्या बत्तीच्या प्रकाशांत सरमिसळ पंगत बसली होती. हरिजनवाड्यांतलीं तरुण मुलें पुढाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून मोकळेपणानें जेवत होतीं. म्हातारे पुढारी त्यांना आग्रहानें लाडू वाढीत होते. कोणाच्याहि कपाळावर तिरसटपणाची रेघसुद्धां दिसत नव्हती. असा हा शिवाशिवी-बाबतचा काळ भराभर मागें पडत आहे.

• • •



## ३. वसंतराव

देवगांवच्या लोकांचा मूळचा पेशा गवळ्याचा होता. या गांवांत देवांचीं बरीच देवळें होतीं म्हणूनच तर या गांवाचें नांव देवगांव पडलें.

इंग्रजांच्या राजवटींत दोन मोठाल्या लढाया झाल्या. इंग्रजाला गरज लागली. इंग्रजानें जंगल तोडलें ! जंगल तोडल्यानें पाऊस कमी झाला. जंगलांतल्या लाकडांबरोबर, डोंगरांतलें गवत सुद्धां इंग्रजानें लढाईवरच्या घोड्यांकरितां, खेचरांकरितां नेलें. देवगांवच्या गाई, बैल, म्हशी चाऱ्यावांचून मेल्या. इंग्रजाला त्याचें काय ? इंग्रजाला लढाई जिंकायची होती. देवगांवचीं गुरें-ढोरें चाऱ्यापाण्यावांचून उपाशी राहिलीं. तरी इंग्रजाला कसली फिकीर !

देवगांवचीं माणसं बाजरी बाजरी करीत राहिलीं, मग कुठं मका मिळाला. असं झालं इंग्रजाच्या वेळीं !

इंग्रजानें देवगांवच्या धरणाकडे पाहिलें नाहीं. देवगांवच्या जमिनीकडे पाहिलें नाहीं, कीं गांवठाणाकडे पाहिलें नाहीं. गांवचा वसूल मिळाला कीं, इंग्रजाचें काम झालें.

देवगांवचीं जनावरें कमी झालीं, शेती धुपून गेली. गांवांतली चावडी, देवळें, घरें पडून गेलीं. लोक देवगांव सोडून मुंबईला गेले. गांवाकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. गांवांतली शाळा एका मास्तरावर कशी तरी चालली होती.

सत्तेचाळीस साल उजाडलें. पंधरा ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला. आमचें देवगांव स्वतंत्र झालें.

मुंबईला देवगांवकर चाळ आहे. चाळीचा तरुण मालक वसंतराव. वसंतराव काँग्रेसच्या चळवळींत होता. वसंतरावानें मुंबईस राहायचें सोडून दिलें. वसंतराव देवगांवला राहायला आला.

रंगराव पाटलाला वाटलें, राहील वसंतराव चार दिवस देवगांवला आणि जाईल परत मुंबईला.

दौलतराव चौधरी म्हणाला, " हीं शिकलेलीं पोरं करतील चार दिवस टुरटुर आणि बसतील गप्प. "

रामधन शेटजीला वसंतरावानें काढलेली सोसायटी मुळींच आवडत नव्हती; पण तो बोलून मात्र कांहींच दाखवीत नव्हता.

वसंतरावनें आपल्या बरोबरीचे मित्र जमवले. कोण कोण जमवले वसंतरावनें ? रंगराव पाटलाचा मुलगा प्रतापराव. दौलतराव चौधरी यांचा हैबतराव. रामधन शेटजींचा वल्लभशेट. हसनभाईचा मुलगा आब्बास. जानकू मिस्त्रीचा हरीभाऊ. शिदबा नायकाचा सोपान.

वसंतराव आल्यापासून तालमीचा रंगच पालटला. जोर, जोडी, बैठका, पकडी झाल्यानंतर सटरफटर गप्पांत तरुणांचा वेळ जात असे. आळींआळींतलीं भांडणं, बांधावरच्या झाडाच्या मालकी-

वरून झालेल्या मारामाऱ्या. तालमी–तालमींतले हेवेदावे. आणि अशाच गप्पा तालीमबाज लोक उगाळून उगाळून पुन्हा त्याच त्याच सांगत असत. वसंतरावनें हें सारें बंद पाडलें, आणि गप्पांना नवीन वळण लावलें.

याचा परिणाम काय झाला ? देवगांवच्या लोकांनीं एक सहकारी पतपेढी काढली. देवगांवला ग्रामपंचायत स्थापन झाली. देवगांवच्या रस्त्यावर रात्रीच्या वेळेकरितां दिव्यांची सोय झाली.

देवगांवच्या चावडीवर रेडिओ आला.

आब्बासभाईनें लोकशिक्षणाचा वर्ग काढला.

आणि हरीभाऊ सुतार वाचनालयाची व्यवस्था पाहूं लागला.

रेडिओ ऐकायला तरुण मुलांबरोबर म्हातारीं माणसें यायला लागलीं. आणि जरा आडबाजूला थांबून माहेरवासिनी बातम्या व गाणीं ऐकूं लागल्या.

आब्बासभाई गोष्टी सांगण्यांत व पोवाडे म्हणण्यांत फार चतुर. यामुळें रात्रीच्या वर्गांत भरपूर लोक येऊं लागले व आज नवी गोष्ट सांग, नवा पवाडा म्हण असं आब्बासभाईला सारेंजण म्हणूं लागले.

वाचनालयांत चित्रांचीं बुकं भरपूर आणा, असें मंडळी म्हणूं लागली.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय



## ४. सुमंत भालेराव

सुमंत भालेराव हा देवगांवचा राहणारा. सुमंताचा बाप बाळोबा मिशनच्या चाकरींत होता. सुमंत मिशनमध्येंच लहानाचा मोठा झाला. सुमंत मुंबईला गेला. तिथें सुगंधा नांवाच्या एका मुलीशीं सुमंताचें लग्न झालें. सुगंधाची आई मिशनच्या दवाखान्यांत कामाला होती. सुगंधा दाईपणाचें काम शिकली होती. सुगंधाला सुइणीचें काम करतां येत होतें.

सुमंत दोर, दोऱ्या, दोरखंडें करण्याच्या कारखान्यांत कामाला होता.

सुमंत आणि सुगंधा यांचा संसार सुखांत चालला होता; पण सुमंतला मुंबईची हवा मानवेना. सुमंत सारखा आजारी पडूं लागला. मग सुमंतला देवगांवची आठवण झाली.

आतां सुमंत व सुगंधा देवगांवांत आले. सुमंतनें मिशन बंगली दुरुस्त केली. बंगली बहुतेक पडून गेली होती. राहण्या-

पुरते कसे तरी दोन खण सुमंतनें उभे केले. नवरावायकोपुढें दुपारच्या भाकरीचा प्रश्न उभा राहिला. नवरा–बायकोनीं म्हणजे सुमंत आणि सुगंधा यांनीं कोंबड्यांची पैदास करायचें ठरवलें. भालेराव कुटुंबाला भांडवल देवगांवच्या सहकारी पतपेढीनें दिलें. मिशन बंगलीजवळचे होलार लोक, मांग लोक यांनीं कांहीं कोंबडया दिल्या. हैबतरावांनीं जातिवंत नरमादीची एक जोडी दिली.

सुमंताचा कोंबडयांच्या पैदासीचा धंदा चांगला चालूं लागला. सुमंत भालेरावानें कोंबडयांचे रोग व त्यावर उपाय यांची माहिती पुण्याला जाऊन सरकारी कोंबडयांच्या पैदास-केंद्रांत राहून करून घेतली.

सुमंतचा धंदा चांगला चालूं लागला. मग त्याबरोबर सुमंत भालेरावनें वदकें पाळलीं.

सुमंत वसंतरावाच्या बैठकींत जात होता. बैठकींत असें ठरलें कीं, कोंबडयांच्या पैदासीचें काम सहकारी पद्धतीवर चालवावयाचें.आतां कोंबडखाना सहकारी रीतीवर चालूं लागला. हिरू लोहार, मारुती मांग आणि अनंता जाधव हे कोंबड-खान्यांची व्यवस्था पाहूं लागले. अंडीं परगांवीं पाठविणें, अंडीं उबविणें, कोंबड्यांच्या खाण्याची व्यवस्था पाहणें, कोंबड्यांच्या रोगराईवर उपाय करणें यांत आतां हिरू, मारुती व अनंता तरबेज झाले.

सहकारी पद्धतीवरचा कोंबड्यांच्या पैदासीचा उपयोग पाहून मांगांनीं घायपातासाठीं भांडवल जमा केलें. सुमंत भालेरावानें दोर, दोऱ्या याच्या धंद्यांत मुंबईला अनुभव घेतलेला होता. भालेरावाचा फायदा मातंग लोकांनीं घ्यायचें ठरवलें.

सुमंत भालेरावाच्या पुढारीपणाखालीं दोर वळण्याचा धंदा जोरानें सुरू झाला. मातंग लोकांनीं तयार झालेला माल पतपेढी-

मार्फत विकावयाचें ठरवलें. आणि देवगांवच्या लोकांनीं पत-पेढीच्या दुकानांतलाच माल विकत घ्यायचें ठरवलें.

पूर्वी मांग लोक कोठेंहि घायपात भिजत घालीत. त्यानें पाण्याला वास येई आणि पाणी पिण्याच्या अगर धुण्याच्या उपयोगास येत नसे.

आतां मांग लोकांनीं नवीच योजना केली. दगडाची एक खाण गांवापासून जरा दूर होती. पावसाळ्यांत पाण्यानें ती भरून जाई. या खाणींतच मांग लोक घायपात भिजत घालीत. यामुळें आतां नदीचें पाणी खराब होत नाहीं आणि घायपातहि भरपूर भिजत घालतां येते. खाणीच्या माळावरच मांग लोक दिवसाचा बराच वेळ काढतात. खाणीच्या माळावरच मांग लोक चऱ्हाट वळतात, दोर वळतात, सौंदर व नाडे माळावरच तयार करतात. घायपाताच्या दोऱ्यापासून बैलांसाठीं मोहरक्या व मुसकीं तयार करतात. मांग लोक घायपातापासून दोर वळीत असतांना अगर मुसकीं तयार करीत असतांना त्यांना शेतकरी लोक मदत करतात. शेतकरी व मांग खेळीमेळीनें काम करतात.

• • •



## ५. सुगंधाताई

देवगांवांत सुगंधा भालेराव राहायला आल्यानें बाया-माणसांना बरें वाटलें. कारण देवगांवांत सुईणीची अडचण होती. सुगंधा शिकलेली असल्यानें ती बायाबापड्यांत तेव्हांच आवडती झाली.

शेतकऱ्यांच्या बायांना फुरसतीचा दुपारचा वेळ घरीं मिळायला कठीण. कारण शेतकऱ्यांचीं माणसें दिवसाचा बहुतक वेळ रानांतच काढतात.

बायाबापड्यांनीं शिकावें असें सुगंधाला फार वाटे. दुपारच्या वेळेला लोकशिक्षणाचा वर्ग सुगंधानें काढला. वर्गांत सुगंधा बायांना कधीं गोष्टी सांगे. कधीं गाणीं म्हणून दाखवी. कधीं रांगोळ्या, चित्रें काढवून घेई. कहाण्या सांगे. बायांना कंटाळा न वाटतां सुगंधानें त्यांना हसत खेळत लिहायला वाचायला शिकविलें. वर्तमानपत्रांतल्या बातम्या मधून मधून सांगून बायांना चालू जगाबद्दलची कल्पना दिली.

सुगंधाचें काम बघून जिल्हा–विकास–मंडळाच्या भगिनी सभासद आशादेवी पवार या फार खूष झाल्या.

एकदां जिल्हा विकास मंडळाच्या सभासद आशादेवी सुगंधाताईच्या लोकशिक्षणवर्गाला भेट देण्यास आल्या म्हणून झाडून सारे गांवकरी जमले होते.

लोकांना श्रीमती आशादेवी पवार म्हणाल्या, "जिल्ह्यांत विकास–योजनेचीं कामें कशी चाललीं आहेत हें पाहण्यासाठीं मी मुद्दाम हिंडतें. भगिनी सुगंधाताई यांनीं देवगांवच्या निरक्षरांना साक्षर करण्याचा आणि जगांतल्या घडामोडी सांगून जागे करण्याचा जो प्रयत्न चालविला आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतें.

सुगंधाताई स्वतः चांगल्या शिकलेल्या व सुईण कामांत आणि औषधपाण्याच्या कामांत हुशार आहेत. आणि सुगंधाताई आपली हुशारी आपल्या जवळ न ठेवतां बायाबापड्यांना आरोग्याचे नियम समजावून सांगतात. लहान मुलांची कशी काळजी घ्यावी हें सांगतात. या त्यांच्या कार्यामुळें मला सुगंधाताईबद्दल फार आदर वाटतो.

तुम्ही पाटील, चौधरी, सुतार, देशपांडे, कुंभार आणि हरिजन असे एकत्र येऊन शिकतां, एकमेकांबद्दल तुम्हांला कमी-अधिकपणा वाटत नाहीं. सुगंधाताईना तर तुमची बहीणच समजतां. याच्या जरा पुढें पाऊल टाकाल का? या तुमच्या माळरानाकडे पाहा. मला तेथें अस्वलवाला दरवेशी दिसत आहे. तो पाहा मोरपिसांची टोपी घातलेला वासुदेव आणि त्याचीं कच्चीं-बच्चीं. डोंबारी, फासेपारधी, ठाकर आणि इतर सर्व गिरिजन दिसत आहेत. कोण शिकवणार त्यांना? भारत स्वतंत्र झाला, याची जाणीव होऊं द्याना त्या हरिजनांना, त्या गिरिजनांना, त्या आदिवासींना—भारत मातेच्या कुशींतल्या लेकरांना...."

एवढें बोलतांच लोकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. बाई म्हणाल्या, "माझें बोलणें तुम्हांला पटलें याचा मला आनंद होतो. आतां तरुणांनीं पुढें यायलाच पाहिजे. तुमच्याजवळ पैसा नाहीं हें मला कबूल आहे. पण श्रम, मेहनत करण्याची ताकद आहे ना? मग श्रमदान करा. तुम्ही श्रमदान केल्यास विकास योजनेतर्फे आम्ही तुम्हांला योग्य तो पैसा पुरवूं."

आजच मी सुगंधाताईच्या लोकशिक्षणवर्गासाठीं पाट्या, पुस्तकें, कंदील, औषधपाणी व करमणुकीचीं साधनें यासाठीं पुरेशी मदत देण्याचें जाहीर करीत आहे. हे पैसे तावडतोब उद्यां मामलेदार कचेरींतून सुगंधाताईनीं आणावे, असें मी सुचवितें. आशादेवींच्या या मदतीबद्दल सर्वांना आनंद झाला.

ही बातमी आजूबाजूच्या गांवांत गेली. वडगांव, पारगांव, घारगांव, निंबगांव येथें प्रौढांचे वर्ग काढलेले होते; आणि या गांवांच्या माळावर फासेपारधी, नंदीबैलवाले, डोंबारी, अस्वल-वाले, वैदू असे लोक मधून मधून उतरत. या भटकणाऱ्या लोकांत वाचनाची आवड मुळींच नव्हती. त्यांच्या विसाव्याच्या वेळीं जाऊन गाणीं, गोष्टी, पोवाडे म्हणून त्यांना शिक्षणाची गोडी लावण्याची कामगिरी कांहीं तरुणांनीं घेतली.

• • •



## ६. विकास मंडळ

श्रीमती आशादेवी पवार यांच्या भेटीपासून देवगांवला नवी चेतना आली.

एके दिवशीं वडाच्या पाराखालीं सारे गांवकरी जमा झाले. रंगराव पाटील, दौलतराव चौधरी, रामधन शेटजी हे जुने प्रमुख पुढारी आले. आणि नवे उमेदीचे सारे जवान जमले. बायासुद्धां कांहीं आल्या; पण बायांचें पुढारीपण सुगंधाताईकडे आलें होतें.

नवे जवान कोणते जमले ते पाहा. वसंतराव देवगांवकर चाळवाले. प्रतापराव रंगराव पाटील. हैबतराव दौलतराव चौधरी. वल्लभ रामधनशेट आगरवाल. आब्बास हसनभाई शेख. हरीभाऊ जानकूजी सुतार. सोपान शिदबा कांबळे. सुमंत बाळोबा भालेराव. हिरूं हैबती होलार. मारुती महादेव कसाव (मांग). अनंता सहादू जाधव (कैकाडी).

हरीभाऊ सुतारानें बोलण्याला सुरुवात केली.

सुगंधाताईचा वर्ग पाहायला बाई आल्या. बाईनीं गांवकऱ्यांना माहिती सांगितली. ती आपणांला पटली; तर आतां आपल्या देवगांवासाठीं विकास-मंडळ निवडा कसें.

सोपानः—आहेतच कीं, आपलं जुनं कारभारी रंगराव पाटील, चौधरी बाबा अन् शेटजी काका.

रंगरावः—पोरांनो, तुम्ही आमचा मान ठेवतां हें बेस. आम्ही तुमच्या आड नाहीं. गुमान मोकळ्या मनानं चालूं द्या बैठक.

चौधरीः—वसंतरावला विकास-मंडळाचा अध्यक्ष करा अन् वसंतरावच्या भोंवतालीं पाळा करून वसलेले आहेत कीं सभासद.

मारुतीः—वसंतराव चाळवाले अध्यक्ष आणि प्रतापराव उपाध्यक्ष.

अनंताः—वल्लभशेट आहेत कीं खजिनदार.

हिरूः—चिटणीस कोण होणार ?

सुमंतः—आहेत कीं तलाठी.

हैबतरावः—तसं नको, सरकारी माणसाच्या जोडीला गांवचा माणूस हवा.

हरिभाऊः—आब्बासभाई आपला चिटणीस.

वसंतरावः—आपल्या गुरुजींना सभासद म्हणून घ्यावं कीं.

सर्वः—बरोबर, बरोबर,

अनंताः—आणखी सभासद करून घ्यायला अध्यक्षांना अधिकार आहे. त्यांनीं भालेराव नवरा-बायकोला मंडळांत घ्यावं, असं मी म्हणतों.

सर्वः—ठीक. ठीक. विसरलचं होतं कीं.

वसंतराव:—बरं मंडळी, मेहनत करून गांवाला उपयोगी पडेल असं कोणतं काम हातीं घ्यावं ?

मोठा आवाज:—धरणाचं ! धरणाचं !

वसंतराव:—घरटीं एक गडी दररोज आला पाहिजे. गड्याबरोबर त्याचं स्वत:चं टिकाव, खोरं, घमेलं पाहिजे. आहे का विचार पसंत ?

लोक:—कबूल आहे.

वसंतराव:—बाकीच्या गोष्टींचा विचार मंडळ करील आणि मग गांवकऱ्यांपुढें मांडील. आज इतकेंच पुरें.

वडाच्या पाराखालची मंडळी हळू हळू पांगली.

आतां विकास मंडळाचे सभासद फक्त राहिले.

"ग्रामविकास मंडळ देवगांव" यानें पुढील कामें करावयाचा आराखडा आंखला.

( १ ) सदोबाच्या पायथ्याशीं गुणवंतीला धरण बांधणें.

( २ ) आगपेटीच्या काड्यांना योग्य असें जंगलांतील लाकूड आहे त्याचा उपयोग करून घेणें.

( ३ ) दगडी पेन्सिली तयार करणें.

( ४ ) शिरगोळे, डिंक, तरवड, हिरडे हे गोळा करणें !

( ५ ) मधुमक्षिका केंद्र चालविणें.

( ६ ) जनावरांची अवलाद सुधारणें.


( ७ ) शिक्षण:—प्राथमिक आणि दुय्यम आणि तसेच ठाकर व कोळी यांना शिक्षण देणें.

( ८ ) बाळंतपणासाठीं व आजाऱ्यांसाठीं इस्पितळ बांधणें.

( ९ ) टंचाईच्या वेळीं उपयोगासाठीं धान्य आणि गवत यांची पेढी काढणें.

( १० ) पैशांची बचत करावयास लावणें.

• • •



## ७. गुणवंतीला धरण

रंगराव पाटील गप्पांच्या रंगांत आले कीं, गुणवंतीच्या धरणाची हकीकत सांगायचे. दौलतराव चौधरी आणि रामधनशेट असे पारावर असले कीं, रंगराव पाटलांची कळी खुलायची.

रंगराव पाटलांच्या लहानपणीं धरणाचा बंधारा नीटनेटका होता. पहिली लढाई इंग्रज आणि जर्मन यांच्यांत झाली त्या वेळीं धरणाची भिंत ढासळली, असें रंगराव पाटील सांगतात.

" सरकारनें सदोबाच्या डोंगरांतलें साग तोडायला हुकूम दिला होता. गांवच्या उगवतीला माळावर सोजिरांचा तळ पडला होता. सोजीर सदोबाच्या डोंगराशीं खिळल्यागत सकाळ सांजचे असायचे. डोंगरपायथ्याला सोजिरांचं नेमबाजीचं शिक्षण चालू होतं.

मागून काळे सैनिक डोंगरपायथ्याला आले. त्या वेळेला धरणाच्या भिंतीचा खराबा झाला. "

पान तंबाखूचा बार भरल्यावर रंगराव खुषींत आले.

रंगराव म्हणाले, "अहो, या लढायांनीं तर रामधनशेटला श्रीमंत केले. नाहींतर काय होतं याच्यापाशीं ? याचा बाप येतांना फक्त रस्सी न लोटा घेऊन आला होता देवगांवांत."

रामधन शेट म्हणाले, "पाटील, ते राहूं द्या. तुम्ही, आम्ही आणि दौलतराव कशावर श्रीमंत झालों हे लोकांना चांगलें माहीत आहे."

चौधरी म्हणाले, "धरणाच्या पाण्यावरून पुन्हा आतां मारामाऱ्या नकोत व्हायला."

"मग काय धरणच नको काय ?" कोणाचा तरी आवाज आला.

पाटीलः—"धरण झालंच पाहिजे; पण भांडणं नकोत. पाण्याच्या पाळीवरून तक्रारी नकोत."

चौधरीः—"वसंतरावांचा काय विचार पडतोय"

वसंतरावः—"आपल्या देवीची मळई आणखी तिच्या जवळचे नंबर यांना बारमहा पाणी पुरेल. चांगलं पन्नास साठ एकरांचें रान आहे. आणखी कोणाला या शेतींत सामील व्हायचें असेल तर व्हावें."

आब्बासभाईः—"माझा इनाम मी तुमच्या सहकारी शेतींत सामील करतो."

सोपानः—"आमच्या हरिजन लोकांकडे ही शेती कसायला द्या. मी घेतों हमी."

सुमंतः—"ज्याच्या त्याच्या जमिनीच्या हिश्शाप्रमाणें त्याचा त्याला वाटा मिळायला पाहिजे हो."

बैठक एवढ्यावर उठली.

हो ना करतां करतां देवगांवच्या तरुणांनीं धरणांतला गाळ काढला. धरणाला बंधारा घातला. फार मोठें काम केलें देवगांवच्या लोकांनीं. विकास योजनेंतून गांवाला मदत मिळाली.

आगोठी जवळ आली. पाऊस पडूं लागला. यंदाचा पाऊसकाळ चांगला झाला. धरण पाण्यानें गच्च भरलें. धरणांत पाण्याचा सांठा झाल्यानें शिवारांतल्या विहिरींना पाणी आलें. जुने लोक बागायत करूं लागले. आणि नवे लोक? ज्यांना जमिनी नव्हत्या असे लोक? आमचे हरिजन बंधु?

सहकारी शेतीचा फायदा घेऊं लागले. तंटा नाहीं. बखेडा नाहीं. कांहीं नाहीं.

सोपाना शिदबा कांबळे हा सहकारी शेतावरचा सरपंच.

देवगांव ग्रामविकास मंडळ सोपान कांबळेला मदत करी.

देवगांव सहकारी पतपेढी सोपान कांबळेच्या उपयोगीं पडली.

रोजगारासाठीं मुंबईला जाणारे तरुण देवगांवला राहिले.

सकाळीं आठाला हजेरी, बाराला सुट्टी, पुन्हा दोनला जुपी आणि सांज पडतांच सुट्टी.


तरुणांना काम मिळालें.

गांवांत भरपूर धान्य झालें. वैरण पुष्कळ पैदा झाली. सभासदांनीं आपलें धान्य शिल्लक ठेवलें, त्याची एक धान्य पेढी काढली. वैरण घरोघर नेली नाहीं. वैरण सरपंच कांबळे यांच्याच ताब्यांत ठेवली.

चारा होण्याच्या आधीं सभासदांना वैरण उपयोगी पडली.

आषाढ श्रावणांत धान्यासाठीं सभासदांना वाण्याचें दुकान पाहावें लागलें नाहीं.

• • •



## ८. ल क्ष्मी

" दिन दिन दिवाळी गाई म्हशी ओवाळी
गाई म्हशी कोणाच्या ? रामलक्ष्मणाच्या "

दिवाळीची अवस होती. गोठ्यागोठ्यांतून गाई म्हशींच्या ओवाळणीचें गाणें ऐकूं येत होतें.

गुरें, जनावरें, गाई, म्हशी ही तुमची आमची संपत्ति.

लक्ष्मी.

पण आहे का तेज जनावरांच्या अंगावर ?

गायवासराला वसुवारसेच्या दिवशीं आपण पुजतों. वसुवारसेच्या दिवशीं गायवासराच्या पायांवर पाणी घालून त्याची पूजा करतों. गायवासरापुढें धान्य ठेवतों; पण मग बाकीच्या दिवशीं ?

बहुतेक आबाळच नाहीं का ?

बैलांचे तसेंच. पोळ्याच्या दिवशीं बैलांचा थाटमाट.

इतर दिवशीं आसुडाचा कडकडाट.

घोड्यांच्या बाबतींत काय निराळे असणार ?

दसऱ्याला झेंडूच्या माळा, इतर दिवशीं घाम गाळा.

कुंभार, वडारी गाढवांची काळजी घेतात कां ?

गाढवच तें. बिचारें उकिरडा फुंकीत हिंडत असतें. शेळी, म्हैस, गाय दूध देतात तोंपर्यंत त्यांच्याकडे जरा लक्ष पुरवायचें. त्या आटल्या कीं, झालीच माया कमी.

आमचें देवगांव याला अपवाद नव्हतें. घरोघर मातीच्याच चुली. पण लोक आतां वाचायला शिकलेत ना ?

लोकशिक्षण वर्गांत निरनिराळी माहिती मिळते लोकांना. शेतकीबाबत लहान लहान पुस्तकें, जनावरांच्या रोगांवरील पुस्तकें, मासिकें, वर्तमानपत्रें देवगांवच्या वाचनालयांत येतात. सरकारनें काढलेलीं छोटीं छोटीं बुकें येतात. तीं लोक वाचतात. त्यावर चर्चा करतात. देवगांवच्या वाचनालयांत 'लोकराज्य' येतें 'सकाळ' येतों, 'मन्वतर' येतें, चित्रमयजगत् येतें, 'हंगाम' येतो, 'शेतकरी' येतो, केसरीसुद्धां येतो.

हीं मासिकें व वर्तमानपत्रें वाचून लोकांची करमणूक होते. व नवी माहिती मिळते.

(१) लोकांना पिकावरच्या रोगांवर कोणता उपाय करावा ही माहिती मिळते.

(२) खतांची माहिती मिळते.

(३) वळूशीं गांठ न घालतां गायी म्हशी गाभण कशा राहातात हें कळतें.

(४) लहानपणीं लग्न करूं नये, हा कायदा समजतो.

(५) हरिजनांशीं वागतांना भेदभाव दाखवूं नये, हें समजतें.

मधून मधून सिनेमाची गाडी देवगांवला येते. गांवच्या चव्हाट्यावर सिनेमाची गाडी सुटते. सगळा गांव चव्हाट्यावर जमा होतो व सिनेमा पाहातो.

सिनेमांत देवी, क्षय, असे आजार व त्यावर उपाय हे दाखवितात.

पंडित जवाहरलाल नेहरू सिनेमांतून लोकांना पाहायला मिळतात. पंडित नेहरूंना फार मोठा मान देशोदेशीचे लोक देतात एवढे लोकांना समजते.

चित्तरंजनचा एंजिनाचा कारखाना, भाक्रा नान्गलचें धरण, हें सिनेमांतून देवगांवकरांना दिसतें.

सिनेमाची गाडी आलटून पालटून कोळवाडीवर व ठाकरवाडीवर जाते. कोळवाडीला आणि ठाकरवाडीला आतां शाळा आहे. शाळेंत लहान मुलें जातात. रात्रीच्या शाळेंत मोठीं माणसें बसतात. करमणूक करून घेतात व शिकवतात. कोळवाडीला व ठाकरवाडीला वाचनालयें आहेत.

वाचनालयें, सिनेमाची गाडी आणि आमचें विकास मंडळ यामुळें वाड्यांना बरे दिवस आले. दर गुरवारी व शनिवारी रात्रीं ठाकरवाडी व कोळवाडी येथें भजन होतें. एकादशीला भारूड होतें. मधून मधून कधीं पोवाडे तर कधीं ढोल, लेजीम कधीं कीर्तन तर कधीं नकला होतात. यावेळीं देवगांवांतलीं माणसें ठाकरवाडींत व कोळवाडींत येतात. कार्यक्रमाच्या शेवटीं, उन्हाळ्यांत कैरीचें पन्हें मिळतें, पावसाळ्यांत चहा करतात आणि मग लोक घरोघर जातात.

• • •



## १. हरिजन आणि गिरिजन

गांवाच्या जवळ पण जरा बाजूला राहतात ते हरिजन. डोंगराच्या म्हणजे गिरीच्या कुशींत राहातात, वावरतात ते गिरिजन.

देवगांवचे हरिजन म्हणजे महार, मांग, चांभार, होलार आणि कैकाडी.

आणि देवगांवजवळचे गिरिजन म्हणजे कोळी व ठाकर.

हरिजन व गिरिजन यांतले चालू जगाची जास्त माहिती असलेले कोणते ? हरिजन.

म्हणजे हरिजनांपेक्षां गिरिजन जास्त मागासलेले आहेत.

आणि गांवोगांव भटकणारे दरवेशी, फासेपारधी, वासुदेव, चित्रकथी, वडारी हे तर अगदींच मागासलेले.

एक दिवस डी. डी. टी. चा फवारा मारणारे लोक देवगांवला आले.

डी. डी. टी. च्या फवारेवाल्यांची मोटार चावडीजवळ उभी राहिली. कामकऱ्यांनीं बादल्या, फक्कीचे डबे, राकेलचे डबे, औषध हारीनें चावडींत लावून ठेवले. कामगारांनीं आळ्या वांटून घेतल्या आणि गांवांतल्या एकूण एक घरांतून फवारा उडवला. मशीद, देऊळ, धर्मशाळा, शाळा सगळ्या ठिकाणीं फवारा उडवला.

डी. डी. टी. मारल्यानें ढेकूण मरतात, पाली, कातणी, झुरळें मरतात.

देवगांवांतलें काम झाल्यावर मोटार ठाकरवाडीवर गेली. ठाकर लोक डी. डी. टी मारूं देईनात. अखेर गांवांतली मंडळी ठाकरवाडीवर गेली. ठाकर लोकांची समजूत घातली. तेव्हां ठाकर लोकांनीं डी. डी. टी मारूं दिली.

देवगांवच्या आजूबाजूला एकदां कॉलऱ्याची सांथ सुरू झाली. कोळी वस्तीवर लागण होणार असें वाटूं लागले म्हणून टोंचायला सरकारी डॉक्टर आले; पण कोळी लोक कांहीं टोंचून घ्यायला तयार होईनात. मग शाळेंतल्या गुरुजींनीं नीट समजावून सांगितलें. नंतर डॉक्टरांनी लोकांना टोंचलें.

अशी आहे आमची जनता.

या जनतेंतून आपणाला खरा माणूस तयार करावयाचा आहे.

आपण सगळेच जंगलांतली संपत्ति वाया घालवतों, नासून टांकतों. तिचा योग्य उपयोग केला पाहिजे.

शहरांतून दलाल येतात आणि खेड्यांतल्या वस्तु अगदीं थोडक्या किंमतींत नेतात.

याला आळा कसा घालणार ?

खेड्यांतल्या लोकांनीं संघटना केली पाहिजे. नाहींतर हाडांचा दलाल येतो. हरिजन वस्तीत जातो. पोतींच्या पोतीं

जनावरांचीं हाडें थोडक्या किमतींत नेतो. मुंबईला तीं हाडें दळून त्यांचें खत करून पुन्हां तीं खेड्यांत खतरूपानें येतात, मात्र महाग किंमतीला.

डिंक, हिरडा, बेहडा, आवळकाठी, बिब्बे, मुरडशेंगा अगदीं कमी किंमतींत दलाल लोक विकत घेतात.

लोकशिक्षण वर्गाचा, सिनेमाचा हरिजनांना फायदा होत होता.

वाचनानें हरिजनांना, गिरिजनांना सहकाराचें महत्त्व, संघटनेचें महत्त्व कळूं लागलें होतें.

आणि अधिक परिणाम होण्यासाठीं कलापथक होतें.

कलापथकामुळें ठाकरवाडींतल्या तरुणांना आपणहि स्वतंत्र पथक काढावें असें वाटूं लागलें. ठाकरवाडीच्या तरुणांनीं कलापथक तयार केलें व शेजारच्या पारगांवांत नेलें. तेथें कांहीं कार्यक्रम केले. ते बरे झाले,त्यामुळें ठाकर लोकांना हुरूप आला. ठाकर लोकांचें कलापथक पाहून कोळी तरुणांनीं एक कलापथक बनवलें आणि घारगांवला नेलें. घारगांवच्या लोकांना कोळी तरुणांचें पथक आवडलें.

• • •



## १०. देवीचा उरूस

चैत्र शुद्ध पंचमीला देवगांवच्या देवीचा उरूस असतो.

उरसाच्या निमित्तानें परगांवला कामधंद्याला राहिलेले देवगांवचे लोक देवगांवांत येतात. दोन दिवस देवगांवांत राहातात. एकमेकांना भेटतात. देवीचें दर्शन घेतात. शेतदुरुस्ती, घरदुरुस्ती यांचा विचार करतात. सोयरिकीबाबत कानोसा घेतात. कुस्त्या पाहून, देवीचा छबिना पाहून, तमाशे, ळळीत, पाहून परत जातात.

गांवाची बैठक असते. नवीन काय करायचें. जुनें काय मोडायचें याचा खल होतो.

यंदा अंबरनाथचा पाहुणा आब्बासभाईकडे आला होता. पाहुण्याचा आगपेट्यांचा कारखाना होता.

आगकाड्यांना उपयोगी पडणारें लांकूड सदोबाच्या डोंगरांत असल्याची खबर पाहुण्याला होती. त्या धोरणावरच पाहुणा

देवगांवला उरसाच्या निमित्तानें आला होता. पाहुण्याचें नांव कासमशेट.

कासमशेटनीं गांवच्या पंचायतीपुढें आगकाड्यांच्या लांकडाचा सवाल टाकला.

घरच्या घरीं लांकूड साळून आब्बासभाईकडे लोकांनीं आणून द्यावें व दाम घेऊन जावें असें कासम शेटनीं सांगितलें.

लोकांना उद्योग मिळेल. पैसा मिळेल. मात्र हें काम पद्धतशीर झालें पाहिजे. सरकारी नियमांत झालें पाहिजे यासाठीं देखरेख मंडळ नेमायचें असें ठरलें.

मग दुसरा प्रश्न निघाला कलापथकाचा. "यंदा तमाशे बोलवायचे नाहींत; कलापथक बोलवायचें" असे सरपंच कांबळे बोलतांच सारी जुनी मंडळी कांबळे यांचें म्हणणें मोडून काढूं लागली. जुनी पिढी आणि नवी पिढी यांचें कांहीं एकमत होईना. शेवटीं तमाशे आणि कलापथक दोन्हीहि बोलवायचे ठरले.

जत्रेचा मुख्य दिवस म्हणजे चैत्र शुद्ध पंचमी आली.

सकाळीच देवीला दूध, दही, मध, तूप, साखर घालून नंतर सुवासिक पाण्यानें आंघोळ घातली. देवीला भरजरी पातळ नेसविलें. मुखवटा चढवला. देवीला सगळे दागिने घातले.

देवी आतां बोलेल असें वाटूं लागले. इतकी सुंदर देवी दिसत होती. गांवचे पंच जमले देवीचे मानकरी आले.

पाटील आले. चौधरी आले. सुतार आले. परीट आले. कुंभार आले. मानकऱ्यांत आब्बासभाई होता आणि सुमंत भालेराव सुद्धां.

जरा खालीं भोई व शिंदनाक हे मानकरी जमले.

सगळ्यांनीं देवीची भाकणूक केली.

"हे आई, काळी पिकव आणि पांढरी सुखी ठेव. तुला

कोणीच मोठा नाहीं आणि कोणीच हलका नाहीं. सगळ्यांना चांगली बुद्धि दे गं जगदंबे."

दिवसभर दर्शनासाठीं माणसांची ये जा सुरू होती. कोळवाडीची,ठाकरवाडीची सगळी माणसें देवीच्या पायां पडायला आली होती.

रात्रीं देवीपुढें 'उदे बोला उदे अंबाबाईचा हो' असें म्हणत म्हणत देवीचा गोंधळ झाला. भराड्यानें भराड घातलें. मग देवीचा छबिना निघाला. छबिन्यांत गांवोगांवच्या दिंड्या आल्या होत्या. सोंगें आलीं होतीं. छबिना गांवांतून मिरवून परत देवळा-पाशीं गेला. आणि मग तमाशांना सुरवात झाली.

तमासगिरांनीं प्रथम गणपतीची प्रार्थना केली म्हणजे गण म्हटला. मग गौळणीला आरंभ झाला. मथुरेच्या बाजाराला गौळणी जाऊं लागल्या. कृष्णाला दूध, दही पाहिजे होतें. गौळणी कांहीं देईनात.

कृष्णाचा सवंगडी पेंद्या म्हणाला, 'अरे कृष्णा, गौळणी दूध नाहीं द्यायच्या, दही नाहीं द्यायच्या, चहा माग म्हणजे देतील."

मंडळींत एकदम हंशा झाला.

गण, गौळण झाल्यावर तमासगिरांनीं श्रियाळ चांगुणाचा वग लावला.

आणि इकडे कलापथकांत हरिजनांच्या मुलांना कुटुंबांत ठेवावें. आपल्या घरच्यासारखें त्यांना वागवावें. असें जो करील त्याला सरकार दरमहा वीस रुपये देईल, अशा प्रकारचा वग लागला होता.

माणसाला माणसासारखें वागवा. कोणाला कमी मानूं नका. कायदे पाळा. दारू बंदीचे फायदे मुलांना शिकवा असे मधून मधून चुटके व संवाद कलापथकांत होते.

देव देवळांत नसून तो माणसांत आहे. हा फटका चौधरीबावांना फार रुचला.


चौधरीबाबाला नातू नव्हता. गुराढोरांचें पाहायला येसू नायकाचा मुलगा पांडू होता. पांडूशीं चौधरीबावा प्रेमानें वागत पण दुरून दुरून. देवीच्या उरुसानें आणि त्या निमित्तानें आलेल्या कलापथकानें चौधरीबावांची झांपड उडाली. आणि त्या दिवसापासून चौधरीबावा पांडूला नातवासमान मानूं लागले.

पहिल्या पहिल्यानें चौधरीबाबा जरा बिचकत. पांडूसुद्धां बिचके. चौधरीबाबांची सून दचके. हैबतराव मात्र मुळींच विटाळ पाळीत नव्हता.

हैबतरावला आपल्या बाबांत झालेल्या फरकाचें नवल वाटलें.

हैबतबाबा ज्याला त्याला सांगूं लागला, हा देवगांवचा पांडू नाहीं. खुद्द पंढरीचा पांडुरंग आहे. पंढरीस जाऊन तेथील पांडुरंगाच्या पायीं डोई ठेवण्यापरीस, ह्या माझ्या पांडूला मी माझ्या नातवासमान मानतों. यांतच मला समाधान आहे. यांतच मला पंढरीचा पांडुरंग पावतो. आणि खरोखर हैबतबाबाला पांडुरंग पावला. चौधरीबाबाला नातू झाला. हैबतरावाला मुलगा झाला.

• • •



## ११. ठाकरवस्ती

महाबळेश्वराहून नाना आणि कान्हा आले. महाबळेश्वरला मधमाशा कशा पाठवाव्यात, मध कसा काढावा, मेणाचें काय करावें याचें शिक्षण देण्याचा वर्ग निघाला होता. त्यासाठीं नाना आणि कान्हा गेले होते.

ठाकरवस्तीपाशीं नाना-कान्हांनीं ' मधुमक्षिका पालन केंद्र ' म्हणजे मधमाशा पाळण्याचें ठिकाण काढलें.

ग्राम–विकास मंडळाचे वसंतराव आले. केंद्र पाहून गेले.

सुगंधाताई औषध देण्याच्या निमित्तानें ठाकरवाडीला आल्या होत्या. त्यांनीं केंद्र पाहिलें.

शिरगोळे, तरवडाची साल, डिंक इत्यादि विकून येणारा पैसा घरखर्चांत घालावयाचा नाहीं, असा ठाकर मंडळींनीं ठराव केला. नाना व कान्हा ठाकर लोकांचा पैसा पोस्टांत ठेवूं लागले. हळू हळू

ठाकर मंडळींना पैशाची बचत कशी करावी, पैसा कसा पोस्टांत ठेवावा याची जाणीव झाली.

आतां नाना व कान्हा ठाकरवाडीचें वाचनालय चालवूं लागले.

एक दिवस गांवांत, एक दिवस कोळवाडीला व एक दिवस ठाकरवस्तीला जायचें आणि तेथील कामाची पाहणी करायची, असें विकास मंडळानें ठरविलें होतें.

शिवाय दवाखाना बांधण्यासाठीं श्रमदान करणारे लोक मंडळाला हवे होते. चवथा हिस्सा गांवानें उचलला कीं, बाकीच तीन हिस्से सरकार देणार याची माहिती विकास-मंडळाचे सभासद लोकांना देऊं लागले. माहिती मिळतांच कोळवाडीला विहीर, ठाकरवाडीला शाळा आणि देवगांवांत दवाखाना बांधायचा लोकांनीं ठरविलें.

यावेळीं कोळी, ठाकर व हरिजन यांतील तरुण मुलें मोठ्या हुरूपानें कामें करूं लागलीं. श्रमदानाबरोबर आठवड्यांतून एकदां मंगळवारीं श्रमभोजन होऊं लागलें.

प्रत्येकानें घरून आणलेल्या चटणी-भाकरीचा गोपाळकाला करून मग तो सर्वांनीं वांटून घ्यायचा असें जणूं ठरून गेलें होतें.

कांहीं दिवसांनीं देवगांवला दवाखाना झाला. बायाबापड्यांचीं सोय झाली. मुलांबाळांना औषधपाणी मिळूं लागलें. देवगांव सुधारलें आणि ठाकरवस्ती सुधारली.

• • •



## १२. आ द र्श गां व

गेले दोन तीन दिवस देवगांवला अधिकाऱ्यांची बरीच वर्दळ सुरू झाली आहे.

का, माहीत आहे का ?

म्हणे गव्हर्नरसाहेब देवगांवला भेट देणार आहेत.

अहो,गव्हर्नरसाहेब नका म्हणूं. राज्यपाल म्हणा, राज्यपाल.

हो राज्यपाल. आपल्या मुंबई राज्याचे राज्यपाल देवगांवला भेट देणार आहेत. मुंबई राज्याचे मुख्य मंत्री त्यांना घेऊन येणार आहेत.

हेलिकॉपटर विमानानें मुख्य मंत्री आणि राज्यपाल मुंबईहून निघून देवगांवला येणार आहेत.

पण कां येणार आहेत ते देवगांवला? तुम्हांला माहीत नाहीं ? अहो, आपलें देवगांव सबंध मुंबई राज्यांत पहिल्या प्रतीचें आदर्श

गांव ठरलें आहे. म्हणून राज्यपाल मुख्यमंत्री आणि इतर कांहीं मंत्री देवगांवला येणार आहेत.

गांवाच्या शिवेपाशीं मंजुळ सनई वाजत होती. चौघडा सनईला साथ देत होता. लोक जयजयकार करूं लागले. कोणाचा? भारत मातेचा. हिंदपुत्रांचा. राष्ट्रपित्याचा.

भारत माताकी जय.
पंडित जवाहरलाल नेहरू की जय.
महात्मा गांधी की जय.
" विकास-योजना यशस्वी करूं,
भारतमाता सुखी करूं. "
असा घोष सुरू झाला.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

ढोल वाजूं लागला. त्याच्या ठेक्यांत लेजीम खुळखुळूं लागली.

राज्यपाल, मुख्य मंत्री आणि इतर सर्व लोक चालूं लागले.

विकास-मंडळाचे अध्यक्ष वसंतराव यांनीं सगळा कार्यक्रम नीट आंखला होता.

जातां जातां पाहुण्यांनीं सुगंधाताईचा दवाखाना नजरेखालीं घातला.

सुमंत भालेरावांचें कोंबड्यांच्या पैदासीचें केंद्र पाहिलें.

मांग लोकांनीं वळलेले दोर दोऱ्या पाहिल्या. पाहुण्यांनीं सहकारी शेतीला भेट दिली, धरण पाहिलें आणि ठाकरवाडी-वरील मधुमक्षिका केंद्र व लोकशिक्षण वर्ग पाहून पाहुणे सभेच्या ठिकाणीं आले.

नाना-कान्हांचे स्वयंसेवक सभेच्या ठिकाणीं उभे होते.

शाळेतल्या गुरुजींनीं आपले बाल सैनिक हजर ठेवले होते.

सभेच्या व्यासपीठावर महात्मा गांधी, पंडित नेहरू, विनोबा भावे यांच्या मोठमोठ्या तसबिरी लावलेल्या होत्या.

देवगांवांतील टापटीप, स्वच्छता, सहकार आणि श्रमदानानें योजना तडीस नेण्याची वृत्ति पाहून राज्यपालांना समाधान वाटलें.

राज्यपालांनीं हिंदींत भाषण केलें. इतक्या सोप्या हिंदींत भाषण केलें कीं, तें सर्वांस नीट समजलें.

राज्यपाल म्हणाले,—

बंधूंनो आणि भगिनींनो, आज मला तुमचा देवगांव पाहण्याची संधि मिळाली हें मी माझें भाग्य समजतों.

आपल्या भारत मातेच्या कुशींत अनेक खेडीं आहेत, तीं अजून अज्ञानांत व दारिद्र्यांत पिचत आहेत. गेल्या आठ वर्षांत खेड्यांतली जनता जागी होत आहे. हें चांगलें चिन्ह आहे. आपल्या मुंबई राज्यांत समाज-विकासाचीं केंद्रें नव्वद हजार चौरस मैलांच्या क्षेत्रांत उघडलीं आहेत. समाज-विकास केंद्रांत सहा हजार तीनशें पंचवीस खेडेगांवांचा समावेश मुंबई राज्यानें केला आहे. (लोक टाळ्या वाजवतात.) आणि तुमच्यासारखे अर्धा कोटी लोक याचा फायदा घेतील अशी सरकारला आशा आहे.

शेंदीडशें वर्षें आपण इंग्रजांच्या राजवटीखालीं असल्यानें आपल्यांतला एकोपा, माणुसकी, दुसऱ्यासाठीं उपयोगी पडण्याचा स्वभाव आपण विसरत चाललों होतों.

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या कृपेनें आपण पुन्हा माणसांत येत आहोंत. पण नुसते चांगले विचार मनांत येऊन काय उपयोग? चांगले विचार कृतींत आले पाहिजेत. यासाठीं पुढारी पाहिजेत, श्रम करणारे लोक पाहिजेत. ते सगळे मला देवगांवांत दिसतात.

आपल्यापुढें एकच प्रश्न नाहीं. अनेक प्रश्न आहेत. स्त्रियांच्या शिक्षणाचा, आरोग्याचा प्रश्न आहे. तो सुगंधाताईंनीं चांगला सोडवला आहे.

हरिजनांच्या प्रश्नाचें उत्तर सोपाना कांबळे यांनीं दिलें आहे.

नाना-कान्हा सारखी जोडी पाहून गिरिजनांचीं दुःखें कमी होतील, असें मला वाटतें. थोड्याच वेळापूर्वीं मी, नाना व कान्हा यांच्याशीं बोललों, त्यांत मला हे तरुण खास गिरिजनांची सेवा करतील, असें दिसलें.

तुम्ही श्रमदानानें केलेलें धरण, तुमची सहकारी शेती, तुमचें सहकारी दुकान आणि आगपेट्यांच्या काड्या, तरवड, हिरडा यांची ग्रामोद्योगाच्या दृष्टीनें केलेली योजना पाहून मी तुम्हांला धन्यवाद देतों. येथील खाणींत आढळणाऱ्या पेन्सिलीच्या दगडाबावत मुंबई सरकार कांहीं योजना आंखीत आहे.


तुमची सहकारी वृत्ति, श्रमदानाची प्रवृत्ति आणि एकी पाहून बापूजींचें रामराज्याचें स्वप्न देवगांवांत साकार झालें आहे, यांत मला शंका वाटत नाहीं.

अशाच प्रकारची काम करण्याची बुद्धि आपणांत वाढो व भारत सुखी होवो एवढेंच परमेश्वरापाशीं माझें मागणें."

राज्यपालांचें भाषण संपलें. नंतर गांवकऱ्यांतर्फें वसंतरावांनीं आभार मानले, हारतुरे झाले. शेवटीं वंदे मातरम् राष्ट्रगीत झाल्यावर सभा संपली.

एकमेकां साहाय्य करूं ।
अवघे धरूं सुपंथ ॥

अनुक्रम २१.८८५
विभाग
क्रमांक
नों. दि. २५।५।५०



नवसाक्षर प्रौढांना उपयुक्त अशीं नवीन प्रकाशनें :—

# प्रौढ शिक्षणमाला

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १. | पुनर्जन्म | : ले. सौ. माणिक पटवर्धन | ०–८–० |
| × | २. | मुरारीचें साळगांव | : ले. ना. ग. गोरे | ०–८–० |
| | ३. | आपली जिमीन | : ले. गो. नी. दांडेकर | ०–८–० |
| | ४. | जागते देव | : ले. शरच्चंद्र गोखले | ०–८–० |
| ● | ५. | चार फरार | : ले. यदुनाथ थत्ते | ०–८–० |
| | ६. | हिरापूरचे हजार हात | : ले. देवळे–जोशी | ०-१०-० |
| | ७. | बिनाबियांचें झाड | : ले. व्यंकटेश माडगूळकर | ०-१०-० |
| × | ८. | गाऱ्यांतील मुलाखती | : ले. शरच्चंद्र टोंगो | ०–८–० |
| × | ९. | रानगांवचा संसार | : ले. प्रभा परुळेकर | ०–८–० |
| | १०. | जनूकाका | : ले. वा. रा. सोनार | ०–८–० |
| × | ११. | गहिना | : ले. यदुनाथ थत्ते | ०–८–० |
| × | १२. | आनंदधाम | : ले. सुमती पोंक्षे | ०-१०-० |
| | १३. | ठकाजी आणि बाताराम | : ले. देवळे–जोशी | ०-१०-० |
| | १४. | पांडा | : ले. शं. रा. देवळे | ०–८–० |
| | १५. | अकिलीची कहाणी | : ले. यदुनाथ थत्ते | ०–८–० |
| | १६. | देवगांवचें रामराज्य | : ले. शां. कृ. क्षीरसागर | ०–८–० |
| | १७. | पुराचें पाणी | : ले. देवळे–जोशी | ०–८–० |
| | १८. | सोनपट्ट्याचे गांवकरी | : ले. सुमती पायगांवकर | ०–८–० |
| | १९. | कोण काय करतो ? | : ले. देवळे–गोंधळेकर | ०-१०-० |

× या पुस्तकांना भारत सरकारच्या लोकसाहित्य समितीनें इ.स. १९५४, १९५५, व १९५६ या वर्षी रु. पांचशें प्रत्येकीं असें बक्षीस दिलें आहे. ● या पुस्तकाला एक हजार रुपये बक्षीस दिलें आहे. तसेच हीं व वरील इतर सर्व पुस्तकें लोकशिक्षण समित्यांच्या कक्षेंतील व इतर ग्रंथालयांनीं विकत घ्यावींत अशी सरकारची शिफारस आहे.

चित्रशाळा प्रकाश

IRBK-0106265

IRBK-0106265